कर्जविषयक धोरण ठरविता येईल व वैयक्तिक कर्जाविषयी प्रश्नांच्या बाबतीत निर्णय घेण्याचे स्वातंत्र्यसुद्धा देण्यात आले आहे.

**सहकारी पतसंरचना संस्था** म्हणजे प्राथमिक सहकारी कृषी पतसंस्था, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक किंवा राज्य सहकारी बँक होय.

**राष्ट्रीय बँक** म्हणजे सहकारी कृषी आणि ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँका होय.

**४४. कर्ज देण्याच्या धोरणाचे नियमन :** (१) कोणतीही संस्था सदस्याव्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीस किंवा आपल्या स्वतःच्या भागांच्या तारणावर किंवा जो सदस्य नसेल, अशा कोणत्याही व्यक्तीच्या तारणावर कर्ज देणार नाही :

परंतु, संस्थेस निबंधकाच्या विशेष मंजुरीने दुसऱ्या संस्थेला कर्जे देता येतील.

[१४][परंतु आणखी असे की, या पोट-कलमातील काहीही, सहकारी पतसंरचना संस्थांनी तयार केलेल्या कर्ज देण्याच्या धोरणाला लागू असणार नाही. तथापि, अशी संस्था, [१५][भारतीय रिझर्व बँकेच्या किंवा राष्ट्रीय बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वांशी] अनुरूप अशा तिच्या स्वतःच्या धोरणाचा अंगीकार करील.]

(२) पूर्वगामी पोटकलमात काहीही अंतर्भूत असले तरीही, संस्थेस ठेवीदाराला त्याच्या ठेवीच्या तारणावर कर्ज देता येईल.

(३) जर राज्यशासनाच्या मते, संबंधित संस्थेच्या किंवा संस्थांच्या हिताच्या दृष्टीने तसे करणे आवश्यक असेल तर, राज्यशासनास, सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे कोणत्याही संस्थेस किंवा संस्थांच्या वर्गास कोणत्याही मालमत्तेच्या तारणावर रक्कम कर्जाऊ देण्यास मनाई करता येईल, त्यावर निर्बंध घालता येईल किंवा त्याचे नियमन करता येईल:

[१६][परंतु, संबंधित संस्थेच्या किंवा संस्थांच्या निधीच्या सुरक्षिततेची खात्री करून घेण्यासाठी, त्यांच्या उद्दिष्टांच्या अभिवृद्धीसाठी, अशा निधीचा योग्य वापर करण्यात यावा यासाठी आणि तो नियमात व उपविधीत घालून दिलेल्या कर्ज देण्याच्या मर्यादेत ठेवता यावा यासाठी, निबंधकास शिखर बँकेच्या मान्यतेने

---

१४. सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ११, क. ९ अन्वये वरील परंतुक जादा दाखल करण्यात आले.

१५. सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १६, क. १८ अन्वये वरील मजकूर मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला (१४.२.२०१३).

१६. सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३, कलम ९ अन्वये या परंतुकाची भर घालण्यात आली.

कोणत्याही संस्थेस किंवा संस्थांच्या वर्गास आपल्या सदस्यांना किंवा इतर संस्थांना ज्या मर्यादेपर्यंत, ज्या शर्तीवर आणि ज्या पद्धतीने कर्जे देता येतील ती मर्यादा व त्या शर्ती व ती पद्धत यांचे सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे आणखी नियमन करता येईल.]

## टिपा

**कर्जे देण्याच्या धोरणाचे नियमन–** संस्थेने कर्ज कोणाला द्यावे याविषयीचे स्पष्टीकरण या कलमात दिलेले आहे.

**पोटकलम १–** संस्थेने सभासदाव्यतिरिक्त कोणत्याही व्यक्तीस कर्ज देता कामा नये. संस्थेच्या सदस्यांचे तीन प्रकार आहेत (१) नाममात्र सदस्य, (२) सहयोगी सदस्य, (३) क्रियाशील सदस्य **–कलम २ (१९) टिपा पहा.** कर्ज देताना तो सदस्य असला पाहिजे ही प्रमुख अट आहे. मग तो नाममात्र सदस्य असला तरी चालेल. सहकारी क्षेत्रात त्याला सामावून घेण्यासाठी व सहकारी कायदा लागू होण्यासाठी नाममात्र सदस्य करून घेण्याची पद्धत आहे.

पोटकलम १ मध्ये सदस्याव्यतिरिक्त कोणालाही कर्ज देऊ नये असे सांगण्यात आले असले तरी ठेवीदार सदस्य असो अथवा नसो त्याला त्याचे ठेवीचे तारणावर कर्ज घेण्याची तरतूद पोटकलम २ मध्ये करण्यात आली आहे. असा ठेव ठेवणारा कलम ९१(१) खंड (क) चे कक्षेत येतो. संस्थेला भागांचे तारणावर कर्ज देण्यास बंधन आहे. भाग हे संस्थेने भांडवल उभारण्यासाठी काढलेले असतात. जर भागांचे तारणावर कर्ज दिले तर स्वतःचेच भांडवलाचे विरुद्ध कर्ज दिल्यासारखे होईल.

तसेच कर्ज घेताना जामीनदार द्यावा लागतो, तो सदस्य आहे किंवा नाही हे पाहिले जाते. कर्ज घेणारा सदस्य व जामीनदार बिगर सदस्य आहे असे चालणार नाही. खरे पाहिले असता जामीनदार बिगर सदस्य असला तर हरकत नसावी कारण कलम ९१(१) (क) खाली त्याचेवर विवाद उत्पन्न करता येतो.

**एका संस्थेने दुसऱ्या संस्थेला कर्ज देणे–** एका संस्थेने दुसऱ्या संस्थेला कर्ज देण्याचे आधी निबंधकाची विशेष मंजुरी घेणे आवश्यक आहे. याचाच अर्थ एका संस्थेने दुसऱ्या संस्थेत किती पैसा गुंतवावा हा महत्त्वाचा मुद्दा उपस्थित होतो. कार्यकारी मंडळातील काही लोक स्वतःच्या प्रतिष्ठेसाठी व स्वार्थासाठी ज्या संस्थेला पैसा द्यावयाचा तिच्या आर्थिक परिस्थितीचा विचार न करता पैसा मंजूर करण्याची शक्यता असते. या शक्यतेला आळा बसावा म्हणून हे नियंत्रण निबंधकाकडे सोपविण्यात आले आहे. सहकारी क्षेत्रातील भांडवलाचा योग्य वापर होऊन सहकारी क्षेत्रांची व्याप्ती वाढावी या दृष्टीने हे नियंत्रण निबंधकाकडे सोपविण्यात आले आहे.

पोटकलम ३ प्रमाणे अंतिम नियंत्रण राज्यशासनाने आपल्याकडे ठेवले आहे. राज्यशासन योग्यायोग्यतेचा विचार करून आदेशानुसार कोणत्याही संस्थेस किंवा

कोणत्याही वर्गातील संस्थांना कोणत्याही मालमत्तेच्या तारणावर रक्कम कर्जाऊ देण्यास नकार देण्याचा, त्यावर बंधन घालण्याचा व त्यात नियमितपणा आणण्याचा अधिकार बजावू शकते.

नागरी बँक सहकारी औद्योगिक संस्थेला आणि गृहनिर्माण संस्थांना कर्ज देऊ शकते. परंतु त्यासाठी काही अटी आहेत:- (१) नागरी बँकांना शासनाची हमी मिळत नाही, पैशाचे साहाय्य मिळत नाही व इतर कोणतेही फायदे मिळत नाहीत, (२) ना हरकत प्रमाणपत्र सेंट्रल फायनान्सिंग एजन्सीकडून मिळवावे लागते. (३) विभागीय सहनिबंधकाची संमती आवश्यक आहे. (४) दिलेले कर्ज हे नागरी बँकेच्या स्वतःच्या निधीच्या ५०% पेक्षा जास्त असता कामा नये.

**आगाऊ दिलेल्या पैशाची वसुली–** सहकारी संस्थेने कोकण प्रांत सहकारी बँक यामध्ये चालू खाते उघडले. त्या संस्थेला बँकेने ओव्हरड्राफ्ट वापरण्याची सवलत दिली. संस्थेने घेतलेले पैसे परत फेडले नाहीत त्यामुळे बँकेने पैशाच्या वसुलीसाठी दावा दाखल केला. या दाव्यामध्ये कलम ९१ लागू होते किंवा नाही व दावा कालबाह्य झाला आहे हा मुद्दा उपस्थित झाला. न्यायालयाने यावर निर्णय देताना असे म्हटले की संस्थेला बँकेने कर्ज दिले नसून आगाऊ पैसे दिले आहेत. त्यामुळे बँकेला संस्थेकडून रकमेची वसुली ६ टक्के व्याज दर लावून करून घेता येईल.– **कोकण प्रांत सहकारी बँक लि. मांगलवाडी, गिरगांव, मुंबई विरुद्ध नाना चौक कंझ्युमर्स को-ऑप. सोसायटी लि., मुंबई, १९८५, सी. टी. जे. ४६५.**

नागरी बँकेचा वैयक्तिक सदस्याला कर्ज देण्यापुरताच व्यवसाय आहे– यू. आर. बी/२१/फिन, दि. २८-६-६१.

नियम ४२ मध्ये संस्थांनी द्यावयाच्या कर्जाचे नियमन कशा पद्धतीने करावयास पाहिजे याचे स्पष्टीकरण केले आहे.

**जंगम किंवा स्थावर मालमत्ता याबाबतचे स्पष्टीकरण** मुंबई सर्वसाधारण परिभाषा, अधिनियम १९०४ (बॉम्बे जनरल क्लॉजेस् ॲक्ट) यातील कलम ३ (२४) मध्ये दिले आहे. "ज्यात जमीन, जमिनीपासून मिळणारे फायदे व जमिनीला ज्या गोष्टी जोडल्या गेल्या आहेत किंवा जमिनीला कायमच्या जोडल्या गेल्या आहेत ती जंगम किंवा स्थावर मालमत्ता होय."

निबंधकाला जर असे आढळून आले की मध्यवर्ती बँकेने दिलेले कर्ज हे संस्थेच्या हिताचे नाही किंवा सहकारी चळवळीच्या विरुद्ध आहे तर अशी कर्जे देण्यास तो मनाई करू शकतो किंवा त्याचे नियमन करू शकतो. **नियम ४२ (८).**

जंगम मालमत्ता तारण ठेवण्यामध्ये अडचणी आहेत. मुख्यतः त्यासाठी जरूर असणारा कर्मचारी वर्ग ठेवावा लागतो. मालमत्तेच्या सुरक्षिततेसाठी योग्य ती काळजी घ्यावी लागते, ज्या जंगम मालमत्तेवर कर्जाऊ रक्कम द्यावयाची असेल त्या मालमत्तेची योग्य ती किंमत करून घ्यावी लागते, जंगम मालमत्ता वेळ आल्यास विकण्यासाठी

योग्य त्या एजन्सीची व्यवस्था हवी असते.

पतपुरवठा चळवळ ही विक्रीचा व्यवसाय झाल्याशिवाय वाढणार नाही व त्यासाठी कृषी उत्पन्नाच्या तारणावर काही रक्कम उचल म्हणून द्यावी लागते व जर संस्थेतर्फे उत्पन्न विकले नाही तर तारण नाहीसे होईल यासाठी कलम ४७ (४) मध्ये अशी तरतूद केली आहे की प्रत्येक सदस्याने आपले कृषी उत्पन्न संस्थेमार्फतच विकले पाहिजे.

कृषी पत पुरवठा संस्था, अमर्यादित जबाबदारी यांना पिकांच्या तारणावर कर्ज देता येते– जी. आर. आर. डी.७३६३/३३ दि. १५-३-३८.

विविध कार्यकारी सह. संस्था यांना सदस्य शेतकऱ्यांना सर्वसामान्यपणे शेतीसाठी लागणारे मध्यम मुदतीचे कर्ज देता येते. त्याचप्रमाणे जरूर लागेल त्याप्रमाणे बैलगाड्या किंवा इतर शेतीची अवजारे घेण्यासाठी कर्ज देता येते. या संस्थांचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे सदस्यांच्या कृषी उत्पन्नाच्या तारणावर कर्ज देणे या संस्थांच्या उपविधीमध्ये अशी तरतूद केलेली असते की सदस्याने आपले उत्पन्न जे तारण म्हणून दिलेले असते, ते संस्थेच्या गोदामात जमा करावयाचे असते. या सदस्यांना संस्था प्रत्यक्ष वस्तूच्या स्वरूपातसुद्धा कर्ज देते.– जी. आर. आर. डी. ७३६३/३३ दि. १५-३-३८. जो सदस्य कर्ज घेणार असतो त्याची स्वतःची जमीन असेल तर त्याने कलम ४८ अन्वये प्रतिज्ञापत्र द्यावयास पाहिजे.

**मध्यवर्ती व नागरी बँका–** या बँका सर्वसाधारणपणे शेती उत्पन्न किंवा सोन्याचे व चांदीचे दागिने यांच्या तारणावर त्यांच्या उपविधीमध्ये नमूद केल्याप्रमाणे कर्ज देतात. हे कर्ज नाममात्र सदस्य जे सर्व जिल्ह्यांमध्ये असतात त्यांना मिळू शकते. नाममात्र सदस्य म्हणजे जो भाग धारण करीत नाही परंतु प्रवेश फी फक्त भरतो व त्याला मत देण्याचा हक्क नाही किंवा भाग धारकांप्रमाणे विशेष सभेला हजर राहण्याचा अधिकार नाही तो होय.

संस्थेच्या निधीचा योग्य व सुरक्षित उपयोग व्हावा या दृष्टीने निबंधकाला स्पष्टीकरणान्वये विशेष अधिकार दिले आहेत.

**जमीन सुधारणा कायद्याखाली सहकारी संस्थांना असलेली सवलत–** महाराष्ट्र कुळवहिवाट आणि शेतजमीन अधिनियम, अन्वये शासनाच्या जमीन सुधारणा तत्त्वाखाली, शासनात व शेतकऱ्यांमध्ये दुसरा कोणताही इसम मध्यस्थी म्हणून नसावा कारण या मध्यस्थी इसमाद्वारे शेतकऱ्यांची पिळवणूक होते.

१९३९ मध्ये मूळ अधिनियम संमत झाला. या अन्वये सर्व कुळांना महत्त्वाचे फायदे मिळाले होते. या अधिनियमान्वये विशेषाधिकार असलेले कूळ निर्माण केले गेले की जे कायमचे कूळ म्हणून राहण्याचा अधिकार त्यांना दिला गेला. कुळांच्या दृष्टीने १९३९ मधील कायदा हा वरदान ठरला. परंतु प्रत्यक्ष त्या कायद्याची अंमलबजावणी करताना ज्या दृष्टिकोनातून हा कायदा बनविला होता, त्याचा उद्देश सफल झाला नाही.

त्यामुळे शासनाने १९४८ मध्ये नवीन कायदा केला व त्यामध्ये १९५६ साली मोठ्या प्रमाणावर सुधारणा करण्यात आली.

सहकारी संस्थांकडे जमीन स्वतःच्या मालकीची असेल अगर भाडेपट्ट्याने असेल तर त्यांना कलम ४३ (अ) (१), महाराष्ट्र कुळवहिवाट अधिनियम, मधील काही तरतुदी, शेतकऱ्यांचे रहाणीमान वाढावे, त्यांची आर्थिक स्थिती सुधारावी वगैरे गोष्टींसाठी लागू होत नाहीत.

कलम ३२-पी प्रमाणे जिल्हाधिकाऱ्याच्या अधिकारात ज्या जमिनी असतील त्या जमिनींची विक्री करताना सहकारी संस्थांना प्रथम प्राधान्य तत्त्वावर विशिष्ट किमतीला विक्री करावयास पाहिजे. सहकारी संस्थांकडे गहाण असलेल्या जमिनीमधील कुळाचा हक्क त्याला कलम २७ (१) प्रमाणे विकता येईल (अधिक माहितीसाठी गुप्ते यांचे महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, २०२१ आवृत्ती पहावी).

**सावकारी अधिनियम, १९४६–** हा अधिनियम निव्वळ ऋणकोला धनकोकडून ठराविक व्याजाने कर्ज मिळावे या हेतूने संमत केला आहे. या अधिनियमातून ज्या सहकारी संस्था कर्जवाटप करीत असतील त्यांना सूट देण्यात आली आहे.– **कलम २ (९) (ड).** परंतु जिल्हाधिकाऱ्याने मान्य केलेल्या व्यक्तीने पिकासाठी पतपुरवठा शेतकऱ्याला केला असेल तर त्याला या अधिनियमाच्या कलम ७ अन्वये अनुमती द्यावयास पाहिजे. हा कायदा संपूर्ण महाराष्ट्रात लागू आहे.

**बॉम्बे ॲग्रिकल्चरल डेटर्स रिलीफ ॲक्ट, १९४७** या कायद्याचा मूळ हेतू म्हणजे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारावी व त्यांची इतर सधन लोकांकडून होणारी पिळवणूक थांबवावी हा होय. या दृष्टीने प्रथम १९३९ मध्ये हा कायदा संमत केला. जे शेतकरी खरोखरीच प्रामाणिक आहेत त्यांनी द्यावयाच्या कर्जाच्या परतफेडीच्या रकमेबाबत सधन इसमांबरोबर तडजोड करावयास भाग पाडण्याची या कायद्यात तरतूद केली होती. त्यामुळे शेतकऱ्यांच्या डोक्यावरील कर्जाचा भार कमी होऊन त्यांची स्थिती सुधारेल याबाबत काळजी घेतली गेली होती व ज्या ठिकाणी शक्य आहे तेथे त्यांना हप्ते बांधून देण्याचीसुद्धा तरतूद केली होती.

हा कायदा १९४७ मध्ये सुधारून नवीन करण्यात आला. कायद्यातील या सुधारणेद्वारे वैयक्तिक सावकारांपेक्षा सहकारी संस्था या जास्त उपयोगी पडाव्यात असे पाहिले आहे.

**महाराष्ट्र तुकडेबंदी आणि तुकडेजोड (प्रतिबंध) अधिनियम, १९४७–** या अधिनियमाच्या कलम ७ (१) अन्वये मालकाशिवाय किंवा त्या जमिनीच्या भागधारकाशिवाय कोणत्याही इसमाला जमिनीचे तुकडे पाडण्यास किंवा जमीन एकत्र करण्यास या अधिनियमान्वये प्रतिबंध करण्यात आला आहे.

परंतु सहकारी कृषी आणि ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक किंवा सहकारी संस्था यांचेकडून कर्ज घेताना जमिनीचे तुकडे पाडणे किंवा एकत्र करणे याबाबत सवलत

दिली आहे.

कोणत्याही सहकारी संस्थेच्या अधिकाऱ्याने कोणत्याही इसमाच्या नावावर कर्ज मंजूर केले असेल परंतु प्रत्यक्षात ते कर्ज त्याच्या स्वतःसाठीच असेल किंवा इतर दुसऱ्या इसमासाठी असेल तर तो व्यवहार बेनामी ठरून कलम १४७ (अ) अन्वये गुन्हा ठरतो व त्याला कलम १४७ (ओ) अन्वये दोन वर्षांची शिक्षा किंवा दंड किंवा दोन्हीही होऊ शकते.

**बिगर सदस्याला दिलेले कर्ज व त्याची वसुली–** कलम ४४ (१) अन्वये संस्था कोणत्याही बिगर सदस्याला कर्ज देऊ शकत नाही. परंतु कलमातील या तरतुदींचा भंग करून बिगर सदस्याला कर्ज दिल्यास, अशा कर्जाची वसुली कलम ९१ अन्वये निबंधक करू शकत नाही. परंतु बिगर सदस्याकडून घेतलेल्या हमी पत्राअन्वये दिवाणी न्यायालयामार्फत कर्जाची वसुली करता येते.– **नाबी बक्ष आणि इतर विरुद्ध महम्मद, ए आय आर १९२९ लाहोर ३३०.**

प्रतिवादी हे कोणत्याही सहकारी संस्थेचे सदस्य नाहीत किंवा त्यांचे भागीदारसुद्धा सहकारी संस्थेचे सदस्य नाहीत. त्यामुळे सहकारी न्यायालयाला वादी व प्रतिवादी यांमधील विवादाचा निर्णय देण्याचा अधिकार नाही. प्रतिवादी हा कोणत्याही संस्थेचा सदस्य नसल्यामुळे व त्याचे कोणत्याही संस्थेशी व्यवहार होत नसल्यामुळे त्यांच्यामधील विवाद कलम ९१ .अन्वये सोडविला जात नाही व त्याला संस्थेच्या विरुद्ध सहकारी न्यायालयात जाता येत नाही. वादाचा निर्णय देण्याचा अधिकार दिवाणी न्यायालयाला आहे.– **दी गंगापूर तालुका सहकारी खरेदी-विक्री संघ लिमिटेड विरुद्ध मेसर्स कृषी विकास (पार्टनरशिप फर्म), १९८२ सी. टी. जे. ३.**

**अधिसूचना–** बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट, १९४९ हा सर्व सहकारी बँकांना १ मार्च १९६६ पासून लागू करण्यात आला आणि या बँकांवर निबंधकांचे व रिझर्व्ह बँकेचे नियंत्रण ठेवले आहे.– क्र. सी. एन. एफ. दि. ६-१२-१९६५.

[१७][**४४ अ. विवक्षित प्रकरणांमध्ये व्याजावर मर्यादा :** कोणत्याही करारामध्ये किंवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, एखादी संस्था [१८][(सहकारी बँका आणि सहकारी कृषी आणि ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक धरून)] जास्तीत जास्त १५ वर्षांपेक्षा अधिक नसेल इतक्या कालावधीसाठी (सदस्य संस्था धरून) कोणत्याही सदस्यास

---

१७. सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम १९ अन्वये कलम ४४ अ बदली दाखल करण्यात आले.

१८. सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, ३ (अ) अन्वये मूळ मजकुराऐवजी वरील मजकूर दाखल करण्यात आला.

तिने दिलेल्या कोणत्याही कर्जाच्या (पुनर्वसन कर्ज धरून, परंतु पाटबंधारे किंवा कृषी विकास प्रयोजनासाठी असलेली दीर्घ मुदतीची कर्जे किंवा कृषीतर [१९][***] प्रयोजनांसाठी असलेली [२०][दहा हजार रुपयांहून] अधिक रकमेची कर्जे वगळून) संबंधात, मग असे कर्ज, महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) अधिनियम, १९८५ च्या प्रारंभापूर्वी किंवा प्रारंभानंतर देण्यात आलेले असो, व्याजापोटी कर्जाच्या मुद्दल रकमेपेक्षा अधिक मोठी रक्कम कोणत्याही रीतीने वसूल करणार नाही.]

[२१][परंतु, या कलमातील तरतुदी ज्यावेळेस सहकारी कृषी आणि ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकांनी कोणत्याही सदस्याला एक लाख रुपयांपेक्षा जास्त कर्ज दिले असेल त्यावेळी या कलमातील तरतुदी लागू होणार नाहीत.]

## टिपा

या कलमान्वये स्पष्ट केले आहे की बँक वगळून व सहकारी बँक धरून इतर संस्थांनी त्यांच्या सदस्यांना १५ वर्षांपर्यंत मुदतीचे कर्ज दिले असेल व महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) अधिनियम, १९८५ याच्या अगोदर किंवा नंतर दिलेले असेल तर त्या कर्जाच्या रकमेवरील व्याज हे मूळ मुद्दलाच्या रक्कमेपेक्षा जास्त (दामदुप्पट) घेता येणार नाही.

ज्या संस्थांनी १५ वर्षांपेक्षा जास्त मुदतीचे कर्ज दिले असेल त्याच्या मूळ मुद्दलावर व्याज आकारण्यावर मात्र या कलमान्वये बंधन नाही.

मुंबई सावकारी अधिनियम कलम २३ अन्वये दामदुप्पट रक्कम वसूल करता येत नाही. परंतु सहकारी संस्थांना या कलमातून सूट दिली आहे.

**व्याजावर मर्यादा—** राज्यशासनाने कलम ४४ अ मध्ये २००५ मध्ये दुरुस्ती करून सहकारी बँका आणि सहकारी कृषी आणि ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँका यांना ज्या शेतकऱ्यांनी कर्ज घेतले असेल व त्यांचे व्याज कर्जाच्या रकमेपेक्षा जास्त होत असेल तर असे व्याज बँकांना वसूल करण्यास या कलमान्वये मनाई करण्यात आली आहे. परंतु अशीही तरतूद यात केली आहे की, ज्या सदस्यांनी (शेतकऱ्यांनी) एक लाखापेक्षा जास्त कर्ज घेतले असेल त्यांच्याबाबत व्याजातील तरतूद लागू होणार नाही म्हणजेच त्यांचे व्याज वसूल करण्यास परवानगी दिली आहे.

---

१९. वरील अधिनियमान्वये "किंवा वाणिज्यिक" हा मजकूर क. १९ (ख) अन्वये वगळण्यात आला (१४.२.२०१३).

२०. सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १६, क. १९(क) अन्वये "तीन हजार रुपयांहून" या ऐवजी वरील मजकूर दाखल करण्यात आला (१४.२.२०१३).

२१. वरील अधिनियमान्वये परंतुक जादा दाखल करण्यात आले. क ३ (ब).

**पुनर्वसन कर्जाची रक्कम वगळण्यात आली आहे.**

मूळ मुद्दलाच्या रकमेपेक्षा जास्त रक्कम व्याज म्हणून कोणत्याही एकावेळी वसूल करता येत नाही– **बापूराव विरुद्ध काशिनाथ, १९४६ नागपूर ४०७. व्ही. एन. नागवेकर विरुद्ध सिटी को-ऑप. बँक, दादर, (१९७८) २ सी. एल. सी. ७९.**

कलम ४४-अ मधील तरतुदीनुसार व्याजापोटी कर्जाच्या मुद्दल रकमेपेक्षा अधिक मोठी रक्कम कोणत्याही रीतीने वसूल करता येत नाही. असे असूनसुद्धा दोन्ही पक्षांनी संमतीनुसार व्याजापोटी जास्त रक्कम देण्यास संमती दर्शविली असली तरी अशा संमतीने कलम ४४-अ मधील तरतुदींना बाधा उत्पन्न होते. त्यामुळे कोणत्याही न्यायालयाने अशा संमतीस परवानगी दिली असल्यास ती बेकायदेशीर ठरते.– **दी सिटी को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड विरुद्ध श्री त्रिलोकचंद सिंग सेठी आणि इतर, १९८६ सी. टी. जे. ५६४.**

दामदुप्पट पद्धतीने रक्कम वसूल करणे हे भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १४ याच्या विरुद्ध आहे.

दावा दाखल करण्याच्या तारखेपर्यंतच दामदुप्पट पद्धत लागू होईल व त्यामुळे न्यायालयाला दावा दाखल करेपर्यंतच दामदुप्पट पद्धत लावता येईल. त्याचबरोबर न्यायालयाला ऋणकोला कोणत्या दराने व्याज आकारावयाचे हे ठरवावे लागेल व तेसुद्धा दावा दाखल करेपर्यंत किंवा रक्कम देईपर्यंत किती व्याज द्यावयाचे ते ठरवावे लागेल.

कलम १०१ अन्वये दिलेल्या प्रमाणपत्रामध्ये नमूद केलेल्या व्याजाच्या दराने कर्जाची वसुली करण्याबाबत हे कलम लागू होत नाही. संपूर्ण मूळ रक्कम व व्याज हे एका वेळेस दामदुप्पट पद्धत टाळण्यासाठी भरावयाचे आहे. जर ऋणकोने ठराविक वेळेत मूळ रक्कम व व्याज भरले नाही तर प्रमाणपत्रान्वये कर्जाची वसुली व्याजासह करता येते– **निवृत्ती नारायण बनकर विरुद्ध आदर्श पाथेगाव विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी लि. व इतर, महा. लॉ जर्नल, १९८४ पान २९४ : १९८४ महा. लॉ रिपोर्टर ३२६ (बॉम्बे): १९८४ सी. टी. जे. २५२ : १९८४ (२) बॉम्बे सी. आर. ६६७ : १९८५ ए. आय. आर. बॉम्बे १३१.**

त्याचप्रमाणे दामदुप्पट पद्धतीने व्याज ज्या वेळेस जप्तीची अंमलबजावणी केली जाते त्या वेळेला लागू करता येत नाही. तसेच एखाद्या विश्वस्ताने देवळाचा निधी आपल्या धंद्यासाठी वापरला असेल तरीसुद्धा हा नियम लागू होत नाही.– **मिसेस संगीता एस. मंत्री वि. सारस्वत को-ऑप. बँक लि., १९८३ सी. टी. जे. ३६६.**

**४५. सदस्य नसलेल्या व्यक्तीबरोबर इतर व्यवहार करण्यावर निर्बंध :** या अधिनियमात तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त, संस्थेने सदस्यांव्यतिरिक्त इतर व्यक्तीशी करावयाचे व्यवहार हे विहित करण्यात येतील अशा निर्बंधांच्या